## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

### उत्कृष्ट पुरस्कारकर्त्याचे कार्य प्रेरणास्पद - कुलगुरु
### विद्यापीठात उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार व वार्षिकांक स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

अमरावती.

अनेकांमध्ये गुणवत्ता आहे. पुरस्काराच्या निमित्ताने ती कळते. प्रेरणा देण्याचे कार्य पुरस्कार सोहळे करीत असतात. उत्कृष्ट पुरस्कार प्राप्तकर्त्याच्या कौतुकास्पद कार्यापासून इतरांनी प्रेरणा घ्यावी, यासाठी पुरस्कार वितरण समारंभ महत्वाचा असतो, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी केले. विद्यापीठाच्यावतीने उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्र-कुलगुरु डॉ. राजेश जयपूरकर, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.एफ.सी. रघुवंशी, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.सौ. स्मिता देशमुख, कुलसचिव डॉ. अजय देशमुख व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

शॉल, श्रीफळ, गौरव प्रमाणपत्र, १०० ग्रॅम चांदीचे पदक व पुस्तक देवून कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य/संचालक स्तरावरील संवर्गात प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड मॅनेजमेंट, बडनेराचे प्राचार्य डॉ. मिर सादिक अली यांचा, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक संवर्गात श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावतीच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. अर्चना देविदास बोबडे यांचा तसेच विद्यापीठ स्तरावरील शिक्षक संवर्गात विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील सहा. प्राध्यापक तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक डॉ. गजानन घनश्याम मुळे यांचा, द्वितीय श्रेणी अधिकारी वर्गवारीत अभियांत्रिकी विभागाचे मालमत्ता अधिकारी श्री राजेश वसंतराव उपाध्ये यांचा, तृतीय श्रेणी कर्मचारी वर्गवारीत परीक्षा विभागातील वरिष्ठ सहाय्यक श्री मनोहर तुकारामजी डोळस यांचा व चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गवारीत महाविद्यालयीन विभागातील शिपाई श्री भारतसिंह रघुनाथसिंह ठाकूर यांचा आणि संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी संवर्गात लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी, जि. यवतमाळचे कनिष्ठ लिपीक श्री विजय शंकरराव उपाध्ये यांचा, तर नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी वाशिम जिल्ह्यातील कारंजा (लाड) येथील श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांचा रु. ५००१/- पारितोषिक देवून सत्कार केला.

शहरी विभागांतर्गत बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक प्राप्त विद्याभारती महाविद्यालय, अमरावती, द्वितीय भारतीय महाविद्यालय, अमरावती, तृतीय भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा, व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक श्री.ह.व्या.प्र.मं.चे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, अमरावती, द्वितीय प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा, तृतीय सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, अमरावती तसेच ग्रामीण विभागांतर्गत बिगर व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक कला महाविद्यालय, मलकापूर, अकोला, द्वितीय आदर्श विज्ञान, ज.भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगांव रेल्वे, तृतीय श्री वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणी आणि कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब तसेच व्यावसायिक गटात प्रथम क्रमांक अनुराधा इंजिनिअरींग कॉलेज, चिखली, द्वितीय क्रमांक डॉ. राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड रिसर्च, अमरावती या महाविद्यालयांच्या उत्कृष्ट वार्षिकांकासाठी कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे हस्ते पारितोषिक देवून महाविद्यालयांना सन्मानित करण्यात आले.

कुलगुरु मार्गदर्शन करतांना पुढे म्हणाले, ३८२ संलग्नित महाविद्यालयांची ताकद विद्यापीठाला असून विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये कार्यरत प्रत्येक घटकाचे योगदान मौलिक राहिलेले आहे. टीम स्पिरीटच्या कार्यामुळे प्रेरणा प्राप्त होते, वातावरण निर्माण होवून गतिमान प्रशासनासाठी साहाय्यभूत ठरते. १ मे, १९८३ रोजी स्थापन झालेल्या विद्यापीठाचा प्रवास पस्तीस वर्षापासून सक्षमपणे सुरु आहे. या सफल प्रवासासाठी अनेकांचे योगदान लाभले असल्याचे सांगून त्यांनी पुरस्कार प्राप्तकर्त्यांचे अभिनंदन केले.

सकाळी विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील प्रांगणात १ मे महाराष्ट्र राज्य स्थापना दिनप्रसंगी ध्वजारोहण कुलगुरुंचे हस्ते पार पडले. याप्रसंगी कुलगुरुंनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

सुरुवातीला विद्यापीठ गीताने व कर्मयोगी श्री संत गाडगे बाबांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कुलसचिव डॉ. अजय देशमुख यांनी पुरस्कारकर्त्यांचा परिचय करुन दिला. संचालन करीत आभार जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाला व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. दिनेश सुर्यवंशी, माजी कुलगुरु डॉ. विलास सपकाळ, प. व मू. मंडळाचे संचालक डॉ.जे.डी. वडते, वित्त व लेखा अधिकारी डॉ. शशीकांत आस्वले, आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ.सौ. मनिषा काळे, प्राधिकारिणी सदस्य डॉ.डी.एस. धोटे, तसेच ह.व्या.प्र.मं. चे डॉ. श्रीकांत चेंडके, विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यापीठाचे प्रथम कुलपती आय.एच. लतीफ यांचे निधनप्रसंगी विद्यापीठाची श्रद्धांजली

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रथम कुलपती तथा महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल इन्द्रीस हसन लतीफ यांचे वयाच्या ९४ व्या वर्षी हैद्राबाद येथे दुःखद निधन झाले. त्यांच्याच कार्यकाळात अमरावती विद्यापीठाची स्थापना १ मे, १९८३ रोजी झाली होती व त्यांनी कुलपती या नात्याने उच्चशिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न केले होते. यावेळी उपस्थितांनी दोन मिनीटे मौन पाळून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

छायाचित्र क्र. १ कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर मार्गदर्शन करतांना.
छायाचित्र क्र. २ उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कारप्राप्तकर्ते
छायाचित्र क्र. ३ वार्षिकांक स्पर्धेतील विजेत्या महाविद्यालयांचे प्रतिनिधी.
छायाचित्र क्र. ४ महाराष्ट्र दिनप्रसंगी ध्वजारोहण करतांना कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर

---

प्रति,

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०२/०५/२०१८.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी